**सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करणेबाबत.**
**श्री. अभिजीत आ. मेंगडे, सहायक संचालक.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन आदेश:- संलेको-२०२६/प्र.क्र.६६/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, तिसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:-२५.०६.२०२६.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
02 JUL 2026
प्राप्त झाले सही

संदर्भ:-

१. वित्त विभाग, शासन आदेश क्र. संलेको-२०२३/(प्र.क्र.१९६)/कोषा प्रशा-२, दि.१४.१०.२०२४.
२. वित्त विभाग, शासन आदेश क्र. संलेको २०२५/प्र.क्र.५१/ कोषा प्रशा-२, दि.१९.०६.२०२५.
३. सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांचे आदेश जा. क्र. मनपा / आस्थावि/७६६/२०२५, दि.२५.०६.२०२५.
४. श्री. अभिजीत मेंगडे, सहायक संचालक यांचा दि.३०.०६.२०२५ रोजीचा अर्ज.
५. सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे आदेश क्र. सहसंलेको/पुणे / आस्था -३ / मविलेसे (राप) / प्रतिक्षाधीन /०६/२०२५/११८९, दि.३०.०६ २०२५.
६. सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे आदेश क्र. सहसंलेको / पुणे / आस्था -३ / मविलेसे (राप) / प्रतिक्षाधीन /०७/२०२५/१८१०, दि.२.७.२०२५.
७. सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे सुधारीत आदेश क्र. सहसंलेको / पुणे/आस्था-३/मविलेसे (राप) / प्रतिक्षाधीन /०७/२०२५/१९७८, दि.१५.७.२०२५.
८. वित्त विभाग, शासन आदेश क्र. संलेको २०२५/प्र. क्र. ८५ / कोषा प्रशा - २, दि.३१.७.२०२५.
९. सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे आदेश क्र. सहसंलेको / पुणे / आस्था - ३ / मविलेसे (राप) / कार्यमुक्त श्री. अ. आ. मेंगडे / ०८/२०२५/ २१८४, दि.०५.०८.२०२५.
१०. श्री. अभिजीत मेंगडे, सहायक संचालक यांचा दि.०४.०८.२०२५ रोजीचा अर्ज.
११. वित्त विभाग, शासन आदेश संलेको-२०२५/प्र.क्र.१३४/कोषा प्रशा-२, दिनांक ३१.१०.२०२५.
१२. वसई-विरार महानगरपालिका यांचे पत्र जावक क्र. वविशम / आस्था / १९६७ दि.३१.१०.२०२५ / २०२५, दि.३१.१०.२०२५.
१३. सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. सहसंलेको / पुणे / आस्था-३ / मविलेसे (राप) / श्री. मेंगडे / प्रति.सहा.सं. / १२ / २०२५ / ३८६७, दिनांक २९.१२.२०२५.
१४. संचालनालयाचे रजा मंजूरी आदेश क्र.संलेवको / प्रशा.राप / का.६ / रजा /०२.०६/२९४/०२४२, दिनांक २४.०२.२०२६.
१५. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.१००१ सेनिवे/१३०/सेवा-४, दिनांक ०२.०६.२००३.
१६. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१.
१७. शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२७/सेवा-६, दिनांक ०३.०३.२०१६.
१८. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र. संलेवको / प्रशा-राप / का.६ / स.प्र.का /श्री. मेंगडे/ ०२.२६ / ३२६ / २६२ / ११८३, दिनांक ०२.०३.२०२६.

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक संचालक संवर्गातील श्री. अभिजीत आ. मेंगडे हे मुख्य लेखा अधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली या पदावर कार्यरत

5
01316/2026/1770
03-07-26

असताना वित्त विभाग, शासन आदेश दिनांक १४.१०.२०२४ अन्वये मुख्य लेखा अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर या पदावर पदस्थापना देण्यात आली. तद्नंतर, संदर्भाधिन दिनांक १९.०६.२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये श्रीम. विद्यारत्न तुकाराम काकडे, उपसंचालक यांची मुख्य लेखा अधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली या पदावर पदस्थापना देण्यात आली. सदर पदावर श्रीम. काकडे दिनांक २५.०५.२०२५ (म.पू.) रोजी हजर झाल्या.

२) त्यामुळे, आयुक्त तथा प्रशासक, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांचे दिनांक २५.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री. मेंगडे यांना मुख्य लेखा अधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली या पदावरुन दिनांक २५.०६.२०२५ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

३) श्री. मेंगडे यांनी संदर्भाधिन क्र.४ येथील दिनांक ३०.०६.२०२५ रोजीच्या अर्जात नमूद केल्यानुसार, श्री. मेंगडे हे दिनांक २६.०६.२०२६ रोजी मुख्य लेखा अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर या पदावर रुजू होण्यासाठी गेले असता सदर पदावर श्री. मेंगडे यांना रुजू करुन घेण्यात आले नाही. त्यामुळे, श्री. मेंगडे यांनी पदस्थापनेच्या प्रतिक्षेत हजर करुन घेण्यास सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांना विनंती केली. त्यानुसार, सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांचे संदर्भाधिन क्र. ५ येथील दिनांक ३०.०६.२०२५ रोजीचे आदेशान्वये श्री. मेंगडे यांना पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे या कार्यालयात दिनांक ३०.०६.२०२५ (म.पू.) रोजीपासून रुजू करुन घेण्यात आले.

४) श्री. मेंगडे यांना सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे दिनांक ०२.०७.२०२५ रोजीचे आदेशान्वये तात्पुरत्या स्वरुपात कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, सोलापूर या पदाचा कार्यभार देण्यात आला. तद्नंतर, श्री. मेंगडे यांना तात्पुरत्या स्वरूपात दिनांक १५.०७.२०२५ पासून कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे या पदाचा कार्यभार देण्यात आला.

५) वित्त विभाग शासन आदेश दिनांक ३१.०७.२०२५ अन्वये श्री. मेंगडे यांना सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महानगरपालिका लेखापरीक्षण शाखा, उपविभाग २, पुणे विभाग (अधिनस्त मनपा गट पुणे, पिंपरी चिंचवड, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) या पदावर नियमित पदस्थापना देण्यात आली.

६) श्री. मेंगडे यांना नियमित पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्यासाठी सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे दिनांक ०५.०८.२०२५ च्या आदेशान्वये दिनांक ०५.०८.२०२५ (म.पू.) पासून सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे या कार्यालयातून कार्यमुक्त करण्यात आले.

७) श्री. मेंगडे यांनी दिनांक ०४.०८.२०२५ रोजीच्या अर्जान्वये वैद्यकीय कारणास्तव दिनांक ०४.०८.२०२५ ते दिनांक ०३.०९.२०२५ पर्यंत ३१ दिवसांची परिवर्तीत रजा तसेच, दिनांक ११.११.२०२५ रोजीच्या दुसऱ्या अर्जान्वये दिनांक ०४.०९.२०२५ ते दिनांक ३१.१०.२०२५ पर्यंत एकूण ५८ दिवसांची अर्जित रजा खाजगी कारणात्सव मंजूर करण्याची विनंती करुन विहित नमुन्यातील रजेबाबतचा अर्ज संचालनालयास सादर केला.

८) वित्त विभाग, शासन आदेश दिनांक ३१.१०.२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये श्री. मेंगडे यांना यापूर्वी दिलेल्या सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महानगरपालिका लेखापरीक्षण शाखा, उपविभाग २, पुणे विभाग (अधिनस्त मनपा गट पुणे, पिंपरी चिंचवड, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) या पदस्थापनेमध्ये अंशतः बदल करुन सुधारीत पदस्थापना उपमुख्य लेखा अधिकारी, वसई-विरार महानगरपालिका, जि. पालघर या पदावर देण्यात आली.

९) श्री. मेंगडे यांना वसई-विरार महानगरपालिका यांचे दिनांक ३१.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपमुख्य लेखा अधिकारी, वसई-विरार महानगरपालिका, जि. पालघर या पदावर दिनांक ३१.१०.२०२५ (म.नं.) रोजीपासून त्यांना रुजू करुन घेण्यात आले.

१०) श्री. मेंगडे यांनी प्रतिक्षाधिन कालावधीत घेतलेल्या रजा संचालनालयाच्या दिनांक २४.०२.२०२६ रोजीच्या आदेशान्वये मंजूर करण्यात आल्या आहेत.

११) श्री. मेंगडे यांना दिनांक २६.०६.२०२५ ते दिनांक ०३.०८.२०२५ पर्यंत एकूण ३९ दिवस म्हणजेच नियमित पदनियुक्तीचे आदेश मिळेपर्यंत पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. यास्तव, सदर कालावधी "कर्तव्य कालावधी" म्हणून नियमित करणे आवश्यक आहे. नियमित करावयाच्या कालावधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दि.२६.०६.२०२५ ते २७.०६.२०२५ | ०२ | अर्जित रजा (कोल्हापूर महानगरपालिकेने रुजू करुन न घेतल्याने) |
| दि.२८.०६.२०२५ ते दि.२९.०६.२०२५ | ०२ | शनिवार व रविवारची शासकीय सुट्टी |
| दि.३०.०६.२०२५ ते दि.०१.०७.२०२५ | ०२ | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे कार्यालयात कार्यरत. |
| दि.०२.०७.२०२५ | ०१ | किरकोळ रजा |
| दि.०३.०७.२०२५ ते दि.१४.०७.२०२५ | १२ | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत जिल्हा कोषागार कार्यालय, सोलापूर येथे कार्यरत. |
| दि.१५.०७.२०२५ ते दि.०३.०८.२०२५ | २० | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे येथे कार्यरत. |
| **एकूण** | **३९** | |

१२) यास्तव, वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम ९ (१४) (फ) व (जी) तसेच, शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२७/सेवा-६, दिनांक ०३.०३.२०१६ मधील तरतूदींच्या अधीन राहून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक संचालक संवर्गातील श्री. अभिजीत आ. मेंगडे यांचा दिनांक २६.०६.२०२५ ते दिनांक ०३.०८.२०२५ रोजीपर्यंतच्या एकूण ३९ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, सदर प्रतिक्षाधिन कालावधीतील

वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ.अ.भसारकर
२५.०६.२०२६.

(अ. अ. भसारकर)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रत:-

१) मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४) महालेखापाल ½, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,*
५) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई,*
६) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे *
७) श्री. अभिजीत आ. मेंगडे, सहायक संचालक*
८) निवड नस्ती, कोषा प्रशा-२,
*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)